नि. फौ. ख. क्र. १६१/२०१७
सरकार – विरुध्द – अशोक गवळी आणि इतर

CNR- MHDH05-001394-2017

## निशाणी क्र. ३८ वर आदेश

अर्ज व त्यावरील खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा आरोपींतर्फे आजचे कामकाज तहकूब होऊन मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. आरोपी यांचे थोडक्यात कथन की, सदरचा खटला आज रोजी चौकशीवर आहे, परंतु आरोपीचे मुळ माहितगार वकील ॲड. एम.बी. साळुंके हे महत्वाचे कामी बाहेरगांवी गेले असल्याने आज रोजी न्यायालयात हजर नाही. तरी आजचे चौकशीचे कामकाज तहकूब होऊन पुढील मुदत मिळावी अशी त्यांनी विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जावर अभियोग पक्षातर्फे हरकत घेण्यात आली. सदरील खटला जुना आहे. आज रोजी साक्षीदार न्यायालयात हजर आहेत. करीता सदरीजल अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. प्रकरण हे सन २०१७ चे आहे. यामध्ये एकूण सहा आरोपी आहेत. त्यापैकी तीन आरोपी हे विधी संघर्षीत आहेत. प्रकरणात आरोपी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द दिनांक २८.०८.२०१८ रोजी दोषारोप निश्चित करण्यात आले. त्यानंतर प्रकरण हे पुराव्यासाठी ठेवण्यात आले होते. आज रोजी साक्षीदार हे

न्यायालयात हजर आहेत. परंतु आरोपी यांचेतर्फे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आला. अर्जातील नमूद कारण हे योग्य व सबळ नाही.

**५.** मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम हा न्यायालयीन कामाकाजवर देखील झाला होता. न्यायालयीन कामकाज हे मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेल्या परिपत्रकान्वये सुरू होते. मा. उच्च न्यायालयाच परिपत्रकान्वये कामकाज हे दिनांक ०२.०८.२०२१ पासून पूर्ववत सुरु झाले आहे.

**६.** अर्ज नामंजुर केल्यास, आरोपी यांचे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे, कारण त्यांची संधी डावलली जाईल. त्यामुळे साक्षी भात्त्यावर अर्ज मंजुर करावासा वाटतो. सबब एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

- अर्ज हा रुपये ३५०/– (अक्षरी रुपये तीनशे पन्नास मात्र) साक्षीभत्ता यावर मंजुर करण्यात येतो.
- सदरची साक्षी भत्ता साक्षीदारांना देण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
RAJU BHASKAR DOLE
Date: 2022.09.20
17:13:30 +0530

( रा.भा.डोळे )

दिनांक : २०.०९.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री

**: <u>प्रमाणपत्र:</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – २०.०९.२०२२.

स्वाक्षरीत/–
लघुलेखक श्रेणी –३